# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

"सर्वोत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार" (Best Department)

सर्व अधिविभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की , शिवाजी विद्यापीठात सन २०१९ पासून "सर्वोत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार" (Best Department) देण्यात येणार आहे. सदरचा पुरस्कार हा सायन्स व अभियांत्रिकी अधिविभागातून एका अधिविभागास व अन्य अधिविभागामधुन एका विभागास देण्यात येणार आहे.

Best Department Proforma हा अधिविभागाच्या इमेल वर पाठविला आहे. त्यांची लिंक पुढीलप्रमाणे आहे. https://forms.gle/9noMySnk2imqLUv66 तरी या लिंकवर माहिती भरुन त्यांची सॉफ्ट व हार्ड कॉपी आवश्यक त्या कागदपत्रासह दि. १२ ऑक्टोबर २०१९ पर्यंत पीजी आस्थापना या विभागाकडे सादर करण्यात यावी.

या पुरस्काराची नियमावली खालील प्रमाणे आहे.

1. सायन्स व अभियांत्रिकी अधिविभागामधून एका अधिविभागास आणि अन्य अधिविभागामधून एका विभागास 'सर्वोत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार' देण्यात येईल.
2. सर्वोत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार' बाबत निवड प्रक्रियेसाठी विहित नमुन्याप्रमाणे Best Department Proforma ऑनलाईन पध्दतीने भरणे अनिवार्य राहिल.
3. गुणांकनास अधिविभागांनी अनुसरून आवश्यक ती कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.
4. निर्णय प्रक्रियेमध्ये समितीचा निर्णय अंतिम राहील.
5. ही योजना पदव्युत्तर अधिविभागांना लागू राहील.
6. जे शिक्षक एकापेक्षा अधिक अधिविभागांमध्ये कार्यरत आहेत त्यांचे योगदान मूळ अधिविभागामध्ये ग्राहय धरण्यात येईल. तथापि, अधिकचा कार्यभार दिलेल्या अधिविभागांमध्ये त्यांचे योगदान असल्यास ते त्या अधिविभागांतर्गत ग्राहय धरण्यात येईल.
7. एकदा पुरस्कार प्राप्त झालेनंतर त्या अधिविभागास पुढील तीन वर्षापर्यंत या योजनेमध्ये पुरस्कार मिळणार नाही.
8. विद्यापीठातील सर्व अधिविभागांनी या पुरस्कार योजनेमध्ये सहभाग घेणे अनिवार्य आहे.
9. दि. 1 ऑगस्ट ते दि. 31 ऑगस्ट या कालावधीमध्ये सदर पुरस्कार योजना राबविण्यात येईल.
10. 'सर्वोत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार' हा सप्टेंबरमध्ये जाहीर करून दि. 18 नोव्हेंबरला देण्यात येईल.

11. एखाद्या वर्षी पुरस्कार योग्य अधिविभागाची निवड न झाल्यास अथवा तरतूद शिल्लक राहिल्यास त्या वर्षीचा निधी मूळ पुरस्कार निधीमध्ये वर्ग करणेत येईल.

12. पुरस्कार प्राप्त अधिविभागाने सदर पुरस्काराचा उपयोग अधिविभाग वृध्दिंगणासाठी करावयाचा आहे आणि त्याचा तपशील कार्यालयास कळविणेत यावा.

13. सदर पुरस्कार योजना कालावधीमध्ये समिती कोणत्याही अधिविभागास भेट देवू शकतील.

14. सदर पुरस्कार योजनेअंतर्गत प्रत्येक अधिविभागाने सादर केलेल्या कागदपत्रांचा संच तयार ठेवणे आवश्यक आहे

15. नियमावलीबाबतीत कोणत्याही प्रकारची संदिग्धता, अस्पष्टपणा किंवा अडचण निर्माण झाली तर त्या बाबतीत अंतिम निर्णय मा. कुलगुरूंचा राहिल.

डॉ. व्ही. डी. नांदवडेकर
कुलसचिव

जा.क्र. आस्थापना/पीजी/"सर्वोत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार"/ 1132

दि. 25 OCT 2019

प्रति,

१. मा.कुलगरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव व वित्त व लेखाधिकारी यांचे कार्यालयास

२. सर्व अधिविभागप्रमुख,

३. इंटरनेट विभाग- सदरचे परिपत्रक व लिंक इंट्रानेटवर प्रसिध्द करावी.